# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/02/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत अशोक नगर कन्हान येथे दिनांक ०४/०२/२०२४ चे १८.३० वा. ते २१.४० वा. दरम्यान यातील तेनाली राउत रा. अशोक नगर हा आपले साथीदारासह व शस्त्रासह अक्षय नाटकरच्या घरी जावुन त्याला व त्याच्या परिवाराला अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन परीसरात दहशत पसरविल्याने पोलिस स्टॉफसह तेनाली राउत याच्या त्याचे राहते घरी शोध घेणे कामी त्याचे राहते घरी कन्हान पोलीसांनी घरझडती घेतली असता त्याचे वडिल **आरोपी नामे— १) संतोष नारायण मधुमटके, २) महिला आरोपी** हे दोघे घरी मिळुन आले. तसेच घरझडती दरम्यान धारदार चाकु वेगवेगळया प्रकारचे मिळुन आले. एकुण १२ चाकु किंमती ८४०/—.रू. जप्त करण्यात आले सदर आरोपी विरूध्द कलम ४, २५ भाहका सहकलम १३५ मपोका अन्वये लेखी तक्रार वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी पोलीस नायक महेश लोकचंद बिसने, पोस्टे कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भा.ह.का १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १) यास अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हरिश सोनभद्रे, मो. क्र. ९५२७६६६९२२ हे करीत आहेत.

## फसवणूक

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील चौधरी हॉस्पीटलचे गेटसमोर दिनांक ०५/०२/२०२४ चे १२.१६ वा. ते १२.३५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— विजय मधुकरराव वेरूळकर, वय ५० वर्ष हे संकेत ज्वेलर्स बुट्टीबोरी येथे मॅनेजरचे काम पाहतात. संकेत ज्वेलर्सच्या मोबाईल नंबर वरून फोन आला की, मी चौधरी हॉस्पीटल बुट्टीबोरी येथुन डॉक्टर जैन बोलत असुन मला अर्जंट १० ग्रॅम सोन्याची चैन हवी आहे तुम्ही चौधरी हॉस्पीटल बुट्टीबोरी येथे घेवुन या मी चौधरी हॉस्पीटल येथेच पैसे देईल असे बोलले तेव्हा फिर्यादी मोटारसायकलने एकटेच जावुन चौधरी हॉस्पीटल बुट्टीबोरी येथे गेले तेव्हा एक बाहेर गेटवर ईसम भेटला त्याचा गोरा वर्ण होता व उंची अंदाजे ५ फुट ८ इंच, लाल शर्ट पॅट काळसर, डोळयावर चष्मा लावलेला व समोरून डोक्यावर टक्कल असलेला त्याने फिर्यादीला विचारले की तुम्ही संकेत ज्वेलर्स येथून आले का फिर्यादीने त्यांना होय म्हणताच सोन्याची चैन आणली का असे विचारताच फिर्यादीने होय म्हटले व त्यांनी चैन मागताच फिर्यादीने त्यांना चैनचे ७२५६७/— रूपये पैसे मागीतले व त्यांनी फिर्यादीला थांबा म्हटले व थोडे गेटचे आत गेले व फिर्यादी सुध्दा त्यांचे मागे जावु लागले व ते परत आले व त्यांनी सोन्याची चैन मागीतली फिर्यादी मोटारसायकल ॲक्टीव्हा क्र. एम. एच.— ४०/बी. एन.— ०८९१ मधुन सोन्याची चैन संकेत ज्वेलर्सचे १२ इंचचे पीशवी सह दिली आणि त्या इसमांना पैश्याची मागणी करताच तुम्ही पैसे लक्ष्मी मेडीकलचे मनोज सर यांचे कडून पैसे घेण्यास सांगीतले फिर्यादी लक्ष्मी मेडीकल येथे आले असता येथे कोणी मनोज नावाचे व्यक्ती नाही अशी माहीती मिळाली. फिर्यादीने पुन्हा चौधरी हॉस्पीटल येथे येवुन काउंटरवर चौकशी केली असता येथे

कोणी डॉक्टर जैन नावाचे कोणीही व्यक्ती नसल्याची माहीती मिळाली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून १० ग्रॅम २५० मीलीग्रॅम सोन्याची चैन किंमती ७२५६७/— रूपयाची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सपोनि. लभाने यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. लभाने मो. क्र. ९५११६४२७२८ हे करीत आहे.

## खापा हद्दीत खुन करून पसार होणारा गुन्हयातील मुख्य आरोपी

## पोलीस स्टेशन खापा यांच्या जाळयात

खापा हद्दीत मौजा पौनिकर यांचे शेतात रामडोंगरी येथे दि. १७/१२/२०२३ रोजी यातील मृतक सुकलाबाई जोंधरू चाचेरे हिचे सोबत झालेल्या भांडणाचे कारणावरून आरोपींनी मृतक हिला दगडाने डोक्यावर मारून ठार मारले व मृतक हीची डेड बॉडी प्लॅस्टीकच्या थैलीमध्ये भरून पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने जवळच असलेल्या पहाडीवर फेकुन दिले. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून पोस्टे खापा येथे अप क्र. ५१९/२३ कलम ३०२, २०१, ३४ भादंवि प्रमाणे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर खुनाच्या तपासा दरम्यान वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार पोलीस स्टेशन खापा येथील पथकाद्वारे आरोपीचा शोध घेत असतांना आरोपींची माहिती घेवुन सतत शोध घेत फिरत असताना दिनांक ०५/०१/२०२४ रोजी दरम्यान गुप्त बातमीदाराद्वारे माहिती वरून फरार आरोपी नामे— मुन्नालाल किसन चाचेरे वय 24 वर्ष रा. चोपा त. गोरेगाव जि. गोंदीया यास पोस्ट हट्टा ता. किरणापूर बालाघाट (मध्यप्रदेश) येथुन ताब्यात घेतले. ताब्यात घेवुन गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता त्याने सांगितले की, मृतक हिचा आरोपी हा नातेसंबंधाने नातू असुन आरोपीची आजी मृतक हिचे व आरोपीची आई यांच्यामध्ये सासु सुनेचे नेहमी झगडाभांडण होत असे. याच गोष्टीचा मनात राग धरून आरोपी नातवाने त्याचे वडील व आई तिघांनी संगनमत करून मृतक हिचा लाकडी काठीने आणि दगडाने ठेचून खुन केल्याचे सांगितले आणि तिचे शव जंगलात टेकडीवर फेकुन दिले होते.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक दहीभाते, पोलीस उपनिरीक्षक मिलींग गेडाम व पथकासह पोलीस हवालदार खोमेश्वर बांबल, महालकर, पोलीस अंमलदार गणेश बघनुरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर